# कृषि विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद मार्फत राबविल्या जाणा-या योजना

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना** |
| २ | **योजना सुरू वर्ष** | २०१७-१८ पासून (१९८२-२०१६ पर्यत **विशेष घटक योजना या नावाने)** |
| ३ | **योजनेचा उद्दंश** | अनुसुचीत जाती व नवबौध्द शेतक-यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत करणे. |
| ४ | **योजनेच्या लाभाचे स्वरुप** | अनुसूचित जाती/नवबौध्द शेतक-यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत करण्यासाठी कृषि विभागामार्फत विशेष घटक योजना सन १९८२ पासून (सध्या **डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने)** राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नविन सिंचन विहीर घेण्यासाठी रू२,५०,०००/- किंवा जुनी विहीर दुरुस्ती साठी रू.५०,०००/-, इनवेल बोअरिंग साठी रू.२०,०००/-, वीज जोडणी साठी १००००/-, पंप संच साठी रू.२०,०००/-, शेततळे अस्तरीकरणसाठी रू.१००,०००/- व तुषार/ठिबक संच साठी रू.२५०००/- किंवा ५०,०००/- च्या मर्यादेत पॅकेज स्वरूपात अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतक-यांना अनुदान देण्यात येते. |
| ५ | **योजनेस पात्र लाभार्थी** | किमान ०.४०हे ते कमाल ६ हेक्टरपर्यंत शेतजमीन व वार्षिक उत्पन्न रू.१,५०,०००/- मर्यादेत आहे असे अनुसूचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी |
| ६ | **योजनंचा लाभ घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती** | या योजनेतंर्गत तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांनी योजनेस विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देतात. योजने बाबत माहीती ठळकपणे सुचना-फलकावर लावणे. लाभधारकांकडून www.agriwell.mahaonline.gov.in या वेबसाइट वर online अर्ज/प्रस्ताव मागविणे. प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची कृषि अधिकारी (विघयो) यांनी निकषांआधारे स्थळ पाहणी व अर्ज काटेकोरपणे छानणी करणे. पात्र ठरणा-या अर्जदारांची यादी तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे पाठविणे. अपात्र ठरणा-या अर्जदारास त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून तसे लेखी कळविणे. संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदविणे. तालुकास्तरावर तयार करण्यात येणा-या पात्र अर्जदार/लाभधारकांचेबाबत भविष्यात काही उणीवा/समस्या उदभवल्यास त्यास गट विकास अधिकारी जबाबदार राहतील. पंचायत समिती स्तरावरुन प्राप्त होणा-या शिफारशीसह पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती राहील.<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - अध्यक्ष<br>जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी - सदस्य<br>कार्यकारी अभियंता, लघुसिचन, जिल्हा परिषद - सदस्य<br>भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी - सदस्य<br>सहाय्यक आयूक्त समाज कल्याण अधिकारी - सदस्य<br>विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) - सदस्य<br>कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य सचिव<br>सदर समितीकडून प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची खात्री करण्याचे दृष्टीने निकषांआधारे |

| | | |
|---|---|---|
| | | काटेकोरपणे छानणी करण्यात येते. पात्र ठरणा-या अर्जदारांची/प्रस्तावांची यादी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळविणे. अपात्र ठरणा-या अर्जदारास त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून तसे लेखी कळविण्यात येते. संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदविण्यात येतो. निवड अंतीम करताना महिला लाभार्थी, अपंग लाभार्थी व स्व. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना अंतर्गत जमिन वाटप लाभार्थी यांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले प्रमाणानुसार संबंधीत लाभार्थींची प्राधाण्याने निवड करण्यात येते. |
| ७ | **योजनंपासुन मिळणारे लाभ व रक्कम** | **अ. क्र.** / **बाब** / **अनुदानाची टक्केवारी** / **उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये)**<br>१ / नवीन विहीर / १०० / रु. २५०,०००/- च्या मर्यादेत<br>२ / जुनी विहिर दुरुस्ती / १०० / रु.५००००/-<br>३ / इनवेल बोअरिंग / १०० / रु.२०,०००/-<br>४ / वीज जोडणी/कनेक्शन / १०० / रु.१०,०००/-<br>५ / पंपसंच / १०० / रु २०,०००/- (१० अश्वशक्ती पर्यत)<br>६ / शेततळे अस्तरीकरण / १०० / रु.१०००००/-<br>७ / तुषार/ ठिबक सिंचनसंच / ३५ / रु. २५,०००/- किंवा ५०,०००/- |
| ८ | **सन २०१८- २०१९ मधील लाभसाठी निवडलेल्या लाभार्थीची संख्या** | १३४ |
| ९ | **सन २०१९- २०२० मधील लाभसाठी निवडलेल्या लाभार्थीची संख्या** | १४२ |
| १० | **योजना राबविण्यासाठी सन २०१९-२० मधील उपलब्ध तरतुद** | (मंजुर नियतव्यय रू.५०० लाख) |
| ११ | **लाभार्थी निवडीसाठी लागणारी कागदपत्रे** | १. आधार कार्ड<br>२. जातीचे प्रमाणपत्र<br>३. तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र (चालु वर्षाचे)<br>४. रेशनकार्ड झेरॉक्स<br>५. ७/१२ ८ अ उतारा<br>६. मतदान कार्ड झेरॉक्स व आधार सलग्न बँक खाते |

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील)** |
| २ | **योजना सुरू वर्ष** | २०१७ (१९९३-२०१६ पर्यत आदिवासी उपयोजना या नावाने) |
| ३ | **योजनेचा उद्देश** | अनुसूचित जमातीच्या शेतक-यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत करणे व त्यांचे जीवनमान उंचावणे. |
| ४ | **योजनेच्या लाभाचे स्वरुप** | अनुसूचित जमातीच्या शेतक-यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य करुन कृषि उत्पन्न वाढविणे व त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावून त्यांना दारिद्ररेषेवर आणणेसाठी कृषि विभागामार्फत **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना** राज्यात सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १) नवीन सिंचन विहीर २) जुनी विहीर दुरुस्ती ३) इनवेल बोअरिंग ४) वीज जोडणी ५)पंप संच ६) एचडीपीइ पाईप ७) शेततळे अस्तरीकरण ८) परसबाग लागवड ९) तुषार/ठिबक पर्यत संच या बाबींवर अनुसूचित जमातीच्या शेतक-यांना पॅकेज स्वरूपात अनुदान देण्यात येते. |
| ५ | **योजनेस पात्र लाभार्थी** | किमान ०.४०हे. ते ६ हेक्टरपर्यंत शेतजमीन व वार्षिक उत्पन्न रू.१५०,०००/- पर्यत आहे असे अनुसूचित जमातीचे शेतकरी |
| ६ | **योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती** | या योजनेतंर्गत तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांनी योजनेस विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देतात. योजने बाबत माहीती ठळकपणे सुचना-फलकावर लावणे. लाभधारकांकडून www.agriwell.mahaonline.gov.in या वेबसाइट वर online अर्ज/प्रस्ताव मागविणे. प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची कृषि अधिकारी (विघयो) यांनी निकषांआधारे स्थळ पाहणी व अर्ज काटेकोरपणे छानणी करणे. पात्र ठरणा-या अर्जदारांची यादी तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे पाठविणे. अपात्र ठरणा-या अर्जदारास त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून तसे लेखी कळविणे. संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदविणे. तालुकास्तरावर तयार करण्यात येणा-या पात्र अर्जदार/लाभधारकांचेबाबत भविष्यात काही उणीवा/समस्या उदभवल्यास त्यास गट विकास अधिकारी जबाबदार राहतील. पंचायत समिती स्तरावरुन प्राप्त होणा-या शिफारशीसह पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून लाभार्थ्याची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती राहील.<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - अध्यक्ष<br>जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी - सदस्य<br>कार्यकारी अभियंता, लघुसिचन, जिल्हा परिषद - सदस्य<br>भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी - सदस्य<br>जिल्हा प्रकल्प अधिकारी (आदिवासी विभाग) - सदस्य |

<table>
<tr><td></td><td></td><td>कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य सचिव<br>सदर समितीकडून प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची खात्री करण्याचे दृष्टीने निकषांआधारे काटेकोरपणे छाननी करण्यात येते. पात्र ठरणा-या अर्जदारांची/प्रस्तावांची यादी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळविणे. अपात्र ठरणा-या अर्जदारास त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून तसे लेखी कळविण्यात येते. संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदविण्यात येतो. निवड अंतीम करताना महिला लाभार्थी, अपंग लाभार्थी व परंपरागत वन निवासी योजना अंतर्गत वन पटटेधारक लाभार्थी यांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले प्रमाणानुसार संबंधीत लाभार्थींची प्राधाण्याने निवड करण्यात येते.</td></tr>
<tr><td>७</td><td>योजनेपासुन मिळणारे लाभ व रक्कम</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>बाब</th><th>अनुदानाची टक्केवारी</th><th>उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये)</th></tr>
<tr><td>१</td><td>नवीन विहीर</td><td>१००</td><td>रु. २५०,०००/- च्या मर्यादेत</td></tr>
<tr><td>२</td><td>जुनी विहिर दुरुस्ती</td><td>१००</td><td>रु.५००००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>इनवेल बोअरिंग</td><td>१००</td><td>रु.२०,०००/-</td></tr>
<tr><td>४</td><td>वीज जोडणी/कनेक्शन</td><td>१००</td><td>रु.१०,०००/-</td></tr>
<tr><td>५</td><td>पंपसंच</td><td>१००</td><td>रु २०,०००/- (१० अश्वशक्ती पर्यत)</td></tr>
<tr><td>६</td><td>शेततळे अस्तरीकरण</td><td>१००</td><td>रु.१०००००/-</td></tr>
<tr><td>७</td><td>तुषार/ ठिबक सिंचनसंच</td><td>३५</td><td>रु. २५,०००/- किंवा ५०,०००/-</td></tr>
<tr><td>८</td><td>एचडीपीइ/पीव्हीसी पाईप</td><td>१००</td><td>रु. ३०,०००/-</td></tr>
<tr><td>९</td><td>परसबाग</td><td>१००</td><td>रु.५००/-</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>८</td><td>सन २०१८-१९ मधील लाभसाठी निवडलेल्या लाभार्थीची संख्या</td><td>१</td></tr>
<tr><td>९</td><td>सन २०१९-२० मधील लाभसाठी निवडलेल्या लाभार्थीची संख्या</td><td>१२</td></tr>
<tr><td>१०</td><td>योजना राबविण्यासाठी सन २०१९-२० मधील उपलब्ध तरतुद</td><td>(मंजुर नियतव्यय रू.५० लाख)</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ११ | **लाभार्थी निवडीसाठी लागणारी कागदपत्रे** | १. आधार कार्ड<br>२. जातीचे प्रमाणपत्र<br>३. तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र (चालु वर्षाचे)<br>४. रेशनकार्ड झेरॉक्स<br>५. ७/१२ ८ अ उतारा<br>६. मतदान कार्ड झेरॉक्स व आधार सलग्न बँक खाते |

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नावं** | **राष्टीय बायोगॅस व खतव्यवस्थापन कार्यक्रम योजना** |
| २ | **योजना सुरू वर्ष** | १९८२-८३ |
| ३ | **योजनेचा उद्देश** | सर्वसाधारण /अल्पभुधारक/बहुभुधारक/भुमीहीन शेतमजुर/अनुसुचीत जाती /अनुसुचीत जमाती व इतर लाभार्थीस दैनंदिन जिवन आवश्यक गरजा भागविणेस/स्वयंपाकासाठी बायोगॅस पुरवविणे / एल.पी.जी. गॅस व इतर पारंपारिक उर्जासाधनांचा वापर कमी करणे/रासायनिक खताचा वापर कमी करणे / शेंद्रिय खताचा वापर करण्यासाठी प्रवृत्त करणे/ग्रामीण भागातील स्त्रीयांचे जीवनमान सुधारणे व त्यांनाहोणारा त्रास कमी करणे/बायोगॅस सयंत्रास शौचालय जोडुन ग्रामीण भागातील स्वच्छता राखण्यास मदत करणे /लाभार्थीचे जिवनमान उंचावणे. |
| ४ | **योजनेच्या लाभाचे स्वरुप** | राष्टीय बायोगॅस व खतव्यवस्थापन कार्यक्रम योजना अंतर्गत गोबरगॅस सयंत्र बांधकाम/शौचालय जोडणी अनुदान मिळते. |
| ५ | **योजनेस पात्र लाभार्थी** | सर्वसाधारण /अल्पभुधारक/बहुभुधारक/भुमीहीन शेतमजुर/अनुसुचीत जाती /अनुसुचीत जमाती व इतर लाभार्थीस |
| ६ | **योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती** | या योजनेतंर्गत महाराष्ट्र शासनाकडुन दर वर्षी लक्षांक वितरीत केले जाते. वितरीत लक्षांक जिल्हा स्तरावरुन तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांना वितरीत केले जाते व लक्षांक नुसार कृषि अधिकारी /विस्तार अधिकारी (कृषि) हे ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी यांचे मासीक व पाक्षीक बैठकित माहिती दिली जोते तसेच योजनेस माध्यमांद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देतात. योजने बाबत माहीती ठळकपणे सुचना-फलकावर लावणे. लाभधारकांकडून अर्ज/प्रस्ताव मागविणे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदरील लाभधारकाची जागेची पहाणी /मार्कआऊट/बांधकामासाठी लागणारे साहित्याची माहिती कृषि अधिकारी/विस्तार अधिकारी (कृषि) हे देतात व प्रशिक्षीत गवंडी कडुन बांधकाम करुन घेण्यात येते. बांधकाम हे स्वतः लाभधारकास करुन ध्यावे लागते. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्यात आवश्यक लागणारे शेनकाला भरल्यानंतर गोबरगॅस प्लॅन्ट कार्यान्वीत झाल्यानंतर त्यास शासकीय अनुदानाचे धनादेश देण्यात येतात.<br>निवड करताना अनुसुचीत जाती/ अनुसुचीत जमाती लाभार्थी, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले प्रमाणानुसार संबंधीत लाभार्थींची निवड करण्यात येते. "प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य" या तत्वानुसार लाभार्थी निवड करण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| ७ | **योजनंपासुन मिळणारे लाभ व रक्कम** | **अ. क्र.** / **बाब** / **अनुदानाची टक्केवारी** / **उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये)**<br>१ / गोबरगॅस सयंत्र उभारणी करणे, / १०० / रु.१२,०००/-<br>२ / शौचालय जोडणी अनुदान / १०० / रु.<br>३ / जिल्हा परिषद /पंचायत समिती स्तरावरुन सेस योजना मधुन ठेवण्यात येणारे अतिरीक्त अनुदान नियोजनानुसार / १०० /<br>४ / स्वयंपाका व्यतिरिक्त इतर कारणांसाठी गॅसचा वापर केल्यास अतिरिक्त अनुदान / १०० / रु. ५,०००/- |
| ८ | **सन २०१९- २०२० मधील लाभार्थीची संख्या** | २०० |
| ९ | **सन २०२०-२१ मध्ये प्रस्तावीत लाभार्थी संख्या** | १४० |
| १० | **योजना राबविण्यासाठी सन २०२०-२१ मधील उपलब्ध तरतुद** | ( अंदाजे रू.      लाख) |
| ११ | **लाभार्थी निवडीसाठी लागणारी कागदपत्रे** | १.बायोगॅस सयंत्र बांधकम मागणी अर्ज<br>२. जनावरे उपलब्ध असले बाबत ग्रामसेवक प्रमाणपत्र.<br>३.जागा उपलब्ध असलेबाबतचे नं.८ ग्रामपंचायत.<br>४.७/१२ ८ अ उतारा<br>५. रेशनकार्ड झेरॉक्स<br>६. अपत्याचे प्रमाणपत्र<br>९.शासकीय सेवेत नसल्याचे प्रमाणपत्र<br>१०.रहिवाशी प्रमाणपत्र<br>११.मतदान कार्ड झेरॉक्स/ आधार कार्ड झेरॉक्स<br>१२.योजनेचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र |

१२.लाभार्थी निवडीच्या अर्जाचा नमुना खालील प्रमाणे आहे.

प्रति,

गट विकास अधिकारी, दिनांकः-

पंचायत समिती---------------- जि.उस्मानाबाद

विषयः- राष्ट्रीय बायोगॅस व खतव्यवस्थापन कार्यक्रम योजनेअंतर्गत गोबर गॅस सयंत्र बांधकाम करुन करुप मिळणे बाबत.

अर्जदाराचे संपुर्णनाव/पत्ता/संपर्क मो नं.----------------------------------------
-----------------------------------------

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, राष्ट्रीय बायोगॅस योजने अंतर्गत गोबर गॅस बांधकाम करवयाचे आहे त्यासाठी लागणारी जागा /आवश्यक असनारी शेन कालासाठी जनावरे उपलब्ध आहे. माझ्या कुटुंबात एकुण संख्या ------ आहे. त्यानुसार मला ... घन मिटर ते ... घन मिटरचे बायोगॅस सयंत्र बांधकाम करुन मिळावे बांधकामासाठी लागणारे साहित्य व संपुर्ण सयंत्र मी कार्यान्वीत केल्यानंतर नियमानुसार शासन अनुदान घेण्यास तयार आहे. तरी बांधकाम करणेसाठी मार्कआऊट व प्रशिक्षीत गवंडी उपलब्ध करुन देण्यात यावे.

अर्जदार (स्वाक्षरी)

नांव-----------------------